दाखल तारीख :— १५/०४/९२.

नोंदणी तारीख :— १५/०४/९२.

निकाल तारीख :—०४/०२/०८.

कालावधी :—१५व.०९म.१८दि.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कराड यांचे न्यायालयात.

(रा.म. शिंदे यांचे समोर.)

रेग्युलर फौजदारी खटला नं. १३३/१९९२.		निशाणी क्र. ७६

महाराष्ट्र सरकार तर्फे —
( तर्फे कराड शहर पोलीस स्टेशन)		फिर्यादी.

वि.

१. मुन्ना रज्जाक मोमीन.
वय— २७ वर्षे., व्यवसाय— रिक्षा ड्रायव्हर.

२. राजु रज्जाक मोमीन. — प्रलंबित
वय— २५ वर्षे., व्यवसाय— हॉटेल व्यवसाय.

३. प्रकाश सुधाकर मिसाळ.		आरोपी.
वय— २० वर्षे., व्यवसाय— मजुरी.

४. सुरेश हिंदुराव पाटील.
वय— २० वर्षे., व्यवसाय— रिक्षा ड्रायव्हर.
सर्व राहणार— मुंढे, ता. कराड.

५. शब्बीर इस्माईल आंबेकरी. — उपशम
वय— २० वर्षे., व्यवसाय— मजुरी.

| | |
|---|---|
| राहणार— गुरूवार पेठ, कराड. | |
| ६. अनिल दादू कांबळे.<br>वय— २० वर्षे., व्यवसाय— मजुरी.<br>रा. मार्केट यार्ड, झोपडपट्टी, कराड. | |
| ७. इकबाल चॉद मुल्ला. — <u>उपशम</u><br>वय— २२ वर्षे., व्यवसाय— रिक्षा ड्रायव्हर.<br>राहणार— १७२, शनिवार पेठ, कराड. | <u>आरोपी.</u> |
| ८. नुरमहंमद अल्लाबक्ष मोमीन.<br>वय— ३५ वर्षे., व्यवसाय— व्यापार.<br>रा. शनिवार पेठ, ता. कराड. | |

<u>भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, ४२७ आणि ४५२ सह कलम ३४ प्रमाणे आरोप.</u>

सरकारतर्फे श्री. सी.ए. वाघे, अभियोक्ता.
आरोपीतर्फे श्री. आर.आर. जानुगडे, विधीज्ञ.

---

<u>नि का ल प त्र</u>
(दिनांक ०४/०२/२००८.)

१. आरोपीं विरूध्द भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, ४२७ आणि ४५२ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केलेबद्दल दोषारोपपत्र ठेवणेत आले आहे.

२.　　　　सरकारी पक्षाचे म्हणणे थोडक्यात खालीलप्रमाणे.

दि. ८/४/१९९२ रोजी रात्री ९:०० वा. चे सुमारास सार्वजनिक बोअरिंगवर पाणी भरणेचे कारणावरून आरोपींनी व इतर अनोळखी इसमांनी प्रस्तुत खटल्यातील मुळ फिर्यादी आनंदराव पाटील यांचे घराचे दार मोडून घरात प्रवेश केला व घरातील सामानाचे नुकसान केले, तसेच फिर्यादीला शिवीगाळ केली व म्हणून तदनंतर फिर्यादीने सदर प्रकाराबाबत आरोपीं विरूध्द प्रस्तुत फिर्याद नोंदविली जिची गु.र.नं. ९७/१९९२ ने नोंद करून घेण्यात आली व तपासाअंती आरोपीं विरूध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

३.　　　　दिनांक १८/०१/२००८ रोजी नि. ६५ अन्वये आरोपी १, ३, ४, ६ व ८ विरूध्द वरील गुन्हयासाठी आरोप ठेवणेत आले व ते त्यास मराठीतून वाचून दाखविणेत आले असता त्यांनी आरोप नाकारले व खटला चालविणेचा आहे असे सांगितले.

४.　　　　आरोपीं विरूध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा न मिळुन आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवदेन हे माफ करण्यात आले आहे व तसा आदेश नि.१ वर करण्यात आला आहे.

५.　　　　वरील फिर्यादीचा विचार करता खालील मुद्दे माझ्या विचाराधीन आहेत व त्यांचे कारणासहीत स्पष्टीकरण खालीलप्रमाणे.

| मुद्दे | | अनुमान |
|---|---|---|
| १. | दि. ८/४/१९९२ रोजी रात्री ९:०० वा. चे सुमारास शनिवार पेठ, मार्केट यार्ड येथील खराडे कॉलनी, प्लॉट नं.७ येथे सर्व आरोपींनी आपसात संगनमताने बेकायदा जमाव जमविला की ज्याचा उद्देश दुखापत करणे असा होता असे सरकारी पक्षाने शाबीत केले आहे काय? | नकारार्थी. |
| २. | वरील तारखेस, दिवशी व ठिकाणी व त्यावेळी आरोपींनी आपसात संगनमताने, बेकायदा जमाव जमविला व दुखापत करणेचे हेतूने बेबंदपणे तोडफोडीचे वर्तन केले असे सरकारी पक्षाने शाबीत केले आहे काय? | नकारार्थी. |
| ३. | वरील तारखेस, दिवशी व ठिकाणी व त्यावेळी आरोपींनी आपसात संगनमताने, बेकायदा जमाव जमवून फिर्यादीचे घरात अनधिकृतपणे घुसून त्यांचे घरातील टयूब, बल्ब, खिडक्याच्या काचा फोडून व दाराची मोडतोड करून फिर्यादीचे अंदाजे रू.३५००/– ते रू.४०००/– चे नुकसान केले असे सरकारी पक्षाने शाबीत केले आहे काय? | नकारार्थी. |
| ४. | वरील तारखेस, दिवशी व ठिकाणी व त्यावेळी आरोपींनी आपसात संगनमताने, बेकायदा जमाव जमवून फिर्यादीला दुखापत करणेचे हेतूने फिर्यादीचे राहते घरात अनधिकृतपणे प्रवेश केला असे सरकारी पक्षाने शाबीत केले आहे काय? | नकारार्थी. |
| ५. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

<u>का र ण मि मां सा</u>

६.      सरकारी पक्षाने आरोपी विरूध्द गुन्हा शाबीतीसाठी आनंदराव पाटील, साक्षीदार क्र.१ यांना नि.७१ लगत तसेच राजेश पाटील, साक्षीदार क्र.२ ांना नि.७३ लगत पासले आहे व सरकारी पक्षाने या कामी नि.७४ लगत घटनास्थळाच्या पंचनाम्याची प्रत दाखल केली आहे व रिक्षा जप्तीच्या पंचनाम्याची प्रत नि.७५ लगत व प्रस्तुत खटल्यातील फिर्याद नि.७२ लगत इ. कागदपत्रे गुदरली आहेत.

<u>मुद्दे क्र. १ ते ४ :—</u>

७.      सर्व मुद्दे हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे ते सर्व एकत्रित विचारात घेतले आहेत.

आनंदराव पाटील, साक्षीदार क्र.१ हे प्रस्तुत खटल्यातील मुळ फिर्यादी आहेत, त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये त्यांच्या फिर्यादीच्या अनुषंगाने असे कथन केले आहे की घटनेदिवशी आरोपींनी अनाधिकाराने त्यांच्या घरात प्रवेश केला व त्यांच्या घरातील साहित्याची मोडतोड केली व म्हणून त्यांनी नि.७२ ची फिर्याद नोंदविली, परंतु सदर साक्षीदार यांनी त्यांच्या उलट तपासामध्ये त्यांच्या सरतपासाच्या विरोधात कथन केले आहे व त्यांनी फिर्यादीतील मजकुर पोलीसांना सांगितल्याचे ठामपणे नाकारले आहे.  तसेच त्यांची आरोपीं विरूध्द कोणतीही तक्रार नसल्याचे त्यांनी ठामपणे कथन केले आहे.  साक्षीदाीर क्र.१, आनंदराव पाटील जे प्रस्तुत खटल्यातील मुळ फिर्यादी आहेत, त्यांनीच त्यांच्या जबाबामध्ये आरोपीं विरूध्द कोणताही पुरावा दिला नसल्यामुळे सरकारी

पक्ष या कामातील फिर्याद निर्विवादपणे शाबीत करू शकलेले नाहीत.

८. राजेश पाटील, साक्षीदार क्र.२ याला सरकारी पक्षाने प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणून तपासले आहे, परंतु या साक्षीदाराने त्याच्या सरतपासामध्ये सदर घटनेची माहिती त्याला त्याच्या वडिलांनी सांगितली असल्याचे त्यांनी ठामपणे कथन केले आहे. तसेच त्यांनी त्यांच्या उलट तपासामध्ये सदरची घटना त्यांनी प्रत्यक्षात पाहिली नसल्याचे ठामपणे कथन केले आहे व त्यामुळे या साक्षीदाराचा जबाब हा आरोपींना दोषी ठरविण्यासाठी पुरेसा नाही.

९. सरकारी पक्षाने प्रस्तुत खटल्यातील घटनास्थळाचा पंचनामा व रिक्षा जप्तीचा पंचनामा शाबीत केला असला तरी मुळ फिर्यादीनेच त्याच्या जबाबात आरोपीं विरूध्द कोणताही पुरावा दिला नसल्यामुळे सदर दिवशी आरोपींनी आपसात संगनमत करून बेकायदेशीर जमाव जमविला व त्या हेतुने फिर्यादीच्या घरात घुसून त्यांच्या घरात तोडफोड केली व फिर्यादीच्या घरातील सामानाचे नुकसान केले व अशा प्रकारे फिर्यादीच्या घरात अनाधिकाराने प्रवेश केला होता ही बाब सरकारी पक्ष शाबीत करू शकलेला नाही व म्हणून मी मुद्दे क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

१०. सरकारी अभियोक्ता श्री. सी.ए. वाघे, तसेच आरोपीचे विधीज्ञ श्री. आर.आर. जानुगडे यांचा युक्तिवाद ऐकला. वरील पुराव्यांचा तसेच दिलेल्या कारणांचा सखोल विचार करून मी या

निर्णयाप्रत आले आहे की सरकारी पक्ष हा आरोपीला निसंशयितरित्या दोषी ठरविण्यास असमर्थ ठरला आहे व म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश करत आहे.

आ दे श

१. आरोपी क्र. १, ३, ४, ६ व ८ यांची भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, ४२७ आणि ४५२ सह कलम ३४ प्रमाणे या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.

२. आरोपींनी दिलेले जामीन कदबे रद्द करणेत येत आहेत.

३. जप्त मुद्देमाल, रिक्षा नं. एमएच ११/ए ०५७७ ही मुळ मालक यासिन रज्जाक मोमीन यास बंधपत्राने यापुर्वीच परत देणेत आली आहे, ती त्याने त्याचेजवळच ठेवावी व सदर बंधपत्र हे अपिलाचा कालावधी संपलेवर रद्द समजणेत यावी.

ठिकाण : कराड.
दिनांक : ०४/०२/२००८.　　(रा.म. शिंदे)
प्रथमवर्ग न्यायदडाधिकारी, कराड.